**ज्ञान प्रबोधिनी प्रशाला**

**५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०**
**इयत्ता ५वी (२०२४-२५)**

---

1. सोबतच्या यादीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींची इयत्ता ५वीतील प्रवेशासाठी त्यांच्या गुणवत्तेनुसार निवड झाली आहे. मात्र प्रवेश घेतेवेळी सांगितलेल्या नियमांपेक्षा वेगळी वैयक्तिक माहिती आढळल्यास प्रवेश रद्द केला जाईल.

2. दि. १ एप्रिल ते दि. १२ एप्रिल २०२४ या दरम्यान प्रशाला कार्यालयात अर्ज भरावा. अर्ज भरल्यानंतर आपल्याला ईमेलने जो युजरनेम व पासवार्ड येईल तो वापरून **jpp.etechschoolonline.com** या संकेतस्थळावर लॉग इन करून शुल्क रुपये १,१०,०००/- भरावे. शुल्क भरल्यानंतर आपल्या पाल्याचा प्रवेश फक्त राखून ठेवला जाईल. दि. ८ मे २०२४ पर्यंत पाल्याच्या इ. ४थीच्या गुणपत्राची, आधारकार्डाची छायामुद्रित प्रत, आधीची शाळा सोडल्याचा मूळ दाखला व एक प्रकाशचित्र असे कार्यालयात द्यावे. त्यानंतरच प्रवेश अंतिमरित्या निश्चित होईल.

3. प्रवेशासाठी कार्यालयीन वेळा पुढीलप्रमाणे असतील-
   सोमवार ते शुक्रवार सकाळी ११.०० ते ४.३० व शनिवारी सकाळी ८.३० ते १२.०० अशी आहे.
4. निवड झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी दि. १३ एप्रिल २०२४ पूर्वी प्रवेश न घेतल्यास दि. १५ एप्रिलपासून जशा जागा रिकाम्या असतील त्याप्रमाणे प्रतीक्षा यादीवरील विद्यार्थी-विद्यार्थिनींना क्रमश: प्रवेश दिला जाईल.

5. शाळेच्या नियमांविषयी व गणवेशाविषयी सूचना प्रशाला कार्यालयात मिळतील.

6. परगावच्या ज्या विद्यार्थ्यांना सहनिवासात प्रवेश घ्यायचा आहे त्यांनी सहनिवासाचा स्वतंत्र अर्ज प्रशाला कार्यालयातून घेऊन जावा. तो दि. १५ एप्रिलपूर्वी प्रशाला कार्यालयात जमा करावा.

   सन २०२४-२०२५ या वर्षासाठी वार्षिक सहनिवास शुल्क रुपये ६०,०००/- आहे. ते दोन हप्त्यांत भरता येईल. अर्ज दिल्यानंतरच सहनिवास शुल्क प्रशालेच्या संकेतस्थळावरून भरता येईल. यंदाच्या वर्षी सहनिवासात पाच जागा शिल्लक असून सोबतच्या यादीतील प्राधान्यक्रमाप्रमाणेच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल.

7. **गुरुवार दि. ११ एप्रिल रोजी सकाळी ९.०० वा. प्रवेशासंबंधी एक पालक-बैठक योजली आहे. त्यास सर्वांनी उपस्थित राहावे.**

8. **इ. ५वीची शाळा सोमवार दि. १० जून २०२४ रोजी सुरू होईल.**

(वाच. मिलिंद नाईक)
प्राचार्य